ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/U / 219 / 2009 /53 / Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M UrbanCircle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect Shri Arjunrao Banduji Kirtishah, Rmanagar, Kranti Chowk, Aurangabad.
(Consumer No. 490010495501)

Dear Sir,

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect Shri Arjunrao Banduji Kirtishah, Rmanagar, Kranti Chowk, Aurangabad.

The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of excess bill issued by Distribution Licensee.

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 09.06.2009 at 13=30 Hrs.

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

Copy to:-

Shri Arjunrao Banduji Kirtishah,
Rmanagar, Kranti Chowk,
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२१९/२००९/५३**

**तक्रार दाखल दिनांक :- ०२/०६/२००९**
**निकाल दिनांक :- १३/०७/२००९**

**श्री अर्जुनराव बंडुजी किर्तीशाही,**
**रमानगर,क्रांती चौक, जालना रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०४९५५०१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०२/०६/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०९/०६/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन जुन २००८ मध्ये त्यांचे मीटर बदलण्यात आले.नवीन मीटर मध्ये रिडींग दिसत नसल्याबाबतची तक्रार त्यांनी महावितरणच्या संबंधित विभागाकडे केली.पण त्यांच्या तक्रारीची दखल न घेता त्यांना सतत वाढीव वीज बिलाची आकारणी करण्यात आली. डिसेंबर २००८ मध्ये त्यांचे मीटर बदलण्यात आले व जुने मीटर व्यवस्थीत असल्याचे त्यांना सांगण्यात आले व त्यांना २०३४०/- रुपयाचे बिल भरण्याचे सांगण्यात आले.सदरील चुकीचे वीज बिल न भरल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला व त्यांनी ३०००/- रुपये पार्ट पेमेंट म्हणुन भरल्यानंतर तो पुर्नजोडणी करुन देण्यात आला. महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेच चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक ०९/०६/२००६ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी सौ.रुक्मीणी किर्तीशाही उपस्थित होत्या महावितरण तर्फे नोडल अधिकारी म्हणुन श्री जी.एस.राठौर तसेच क्रांतीचौक विभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री नलबलवाड उपस्थित होते.त्यांनी अर्जदाराचे मीटर दोन वेळा बदलण्यात आल्याचे सांगत अर्जदाराने मे २००८ ते जानेवारी २००९ या काळात ३७१० युनीट वीज वापर केला असल्याचे सांगितले अर्जदाराचे जुने मीटर चाचणीसाठी पाठविण्यात आले असुन ते योग्य असल्याचे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे.महावितरण तर्फे मीटर बदली अहवाल,स्थळपाहणी

अहवाल दाखल करण्यात आला नसल्यामुळे तसेच सी.पी.एल. वर काही महीन्यात **INACCE** स्टेटस दाखवुन वीज बिलाची आकारणी केल्याचे दिसुन आल्यामुळे मंचाने अर्जदारास ते मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येवु नये असा अंतरिम आदेश पारीत केला व पुढील सुनावणी १६/०६/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक १६/०६/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. त्यांनी मीटर बदली अहवाल, स्थळ पाहणी अहवाल तसेच मीटरबाबत चाचणी विभागाचा अहवाल मंचात दाखल केला. मंचाने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या कागदपत्राची पाहणी केल्यावर फॉल्टी स्टेटस दाखवत आकारण्यात आलेल्या वीज बिलाबाबत बिल रिव्हीजन दाखल केले नसल्याचे आढळुन आले. मंचाने नोडल अधिकारी यांना ते १९/०६/२००९ पर्यंत दाखल करण्याचे आदेश देवुन प्रकरण निकालासाठी राखुन ठेवले.

४) अर्जदार व महावितरण तर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्राची पाहणी केल्यावर असे आढळुन येते की, अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन अर्जदारास मार्च २००७ पर्यंत मीटर वरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारणी केली असल्याचे दिसुन येते. एप्रिल २००७ मध्ये मागील रिडींग २९०४ व चालु रिडींग २९२९ दाखवत २५ युनीट ऐवजी ६३ युनीट वीज वापराचे बिल देण्यात आले, तसेच जुन २००७ मध्ये फॉल्टी स्टेटस दाखवत ६१ युनीटचे सरासरीवर आधारीत बिल देण्यात आले. अर्जदाराचे मीटर हे २५/०४/२००८ रोजी बदलण्यात आले तेव्हा जुन्या मीटरवरील रिडींग ही ३२७५ अशी असल्याचे स्पष्ट होते. मीटर बदली अहवाल जुन्या मीटरचे सिल व्यवस्थीत असल्याचे नमुद केले आहे.यावरुन जुन २००७ नंतर

मीटर बदली केलेल्या काळापर्यंत वीज मीटर वरील नोंद बरोबर घेण्यात आली नसल्याचे दिसुन येते.अर्जदारास जुन २००० ते २५/०४/२००८ या काळात ३२७५-३०००=२७५ युनीट वापराचे बिल विभागुन देणे योग्य ठरेल असे मंचाचे मत आहे. नोडल अधिकारी यांनी मंचात बिल रिव्हीजन प्रस्ताव दाखल केला असुन ३२१५.८७/-रुपये क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली आहे. महावितरण तर्फे अर्जदाराकडे दिनांक २५/०४/२००८ रोजी ९००१६५६५०१ या क्रमांकाचे मीटर बसविण्यात आले व हे मीटर २७/१२/२००८ रोजी बदलण्यात येवुन त्याजागी १०९३७८०५ या क्रमांकाचे नवीन मीटर बसविण्यात आले. यावरुन ९००१६५६५०१ या क्रमांकाचे मीटर हे २५/०४/२००८ ते २७/१२/२००८ या काळात मीटरवर नोंदविलेल्या रिडींग प्रमाणे अर्जदाराचा एकुण वीज वापर ४३४९-०१=४३४८ नोंदविला गेल्याचे दिसुन येते.अर्जदाराची या मीटर बाबत तक्रार आहे.दिनांक २१/०१/२००९ रोजी अर्जदाराचे १६५६५०१ या क्रमांकाचे मीटर चाचणी विभागात तपासण्यात आले.यावेळी अर्जदार प्रतिनिधी म्हणुन सौ.शंकुतला किर्त्तीशाही उपस्थित होल्या. या अहवालाचे निरीक्षण केल्यावर मीटर वरील रिडींग ही ०४३४९ अशी असल्याचे नमुद केलेले दिसुन येते तसेच मीटरमध्ये कोणताही दोष नसल्याचे नमुद केले आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण तर्फे जुन २००७ ते एप्रिल २००८ या काळात देण्यात आलेल्या वीज बिलात ३२१५=५७/- रुपयाचे क्रेडीट देण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

२) महावितरण तर्फे अर्जदारास मीटर क्रमांक १६५६५०१ वरील नोंदीप्रमाणे देण्यात आलेले वीज बिल योग्य असुन अर्जदाराने या मीटरबाबत केलेली तक्रार खारीज करण्यात येत आहे.

३) महावितरण तर्फे अर्जदारास ३० दिवसात वरीलप्रमाणे सुधारीत वीज बिल द्यावे ज्यात व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२१९/२००९/५३** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री अर्जुनराव बंडुजी किर्तीशाही,**
**रमानगर,क्रांती चौक, जालना रोड,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००१०४९५५०१)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२१९/२००९/५३ )

आपण दिनांक ०२/०६/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**